नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०३ Issue - 303 | वार बुधवार दि. २५ मार्च २०२६ Blow- Wednesday Date 25 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भोंदूबाबा अशोक खरातप्रकरणात पुरावा आढळणाऱ्या प्रत्येकावर कारवाई

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली ग्वाही; सविस्तर निवेदन सादर करून कारवाईचा दिला इशारा


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात ज्या-ज्या व्यक्तीविरुद्ध पुरावा मिळेल, त्या प्रत्येकाची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. तसेच खरातच्या शिवनिका संस्थानच्या कार्यकारी संचालक मंडळाची सखोल चौकशी सुरू असून, गैरकृत्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी विधानसभेत या प्रकरणाविषयी सविस्तर निवेदन करत तपासाची सद्यस्थिती मांडली. ते म्हणाले, आतापर्यंत पाच पीडित महिलांचे जबाब नोंदवण्यात आले असून, एकूण आठ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी सात गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) करत आहे, तर एक गुन्हा नाशिक क्राईम युनिटकडे आहे. हा अंतरिम अहवाल असून दररोज नव्या बाबी समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. आपण सगळे राजकारणात आहोत, त्यामुळे फोटो कुणासोबतही येऊ शकतो. मात्र, सध्या डिलिटेड डेटा अवगत करण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार, खरातचा कोणाशी संपर्क होता, कोणी मदत केली, त्या सर्वांवर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

वावी (जि. नाशिक) पोलीस ठाण्यात २० डिसेंबर २०२५ रोजी अशोककुमार एकनाथ खरात यांच्या नावाने दाखल तक्रारीत व्हॉट्सपद्वारे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, प्राथमिक तपासात या तक्रारीस ठोस पुरावा मिळाला नाही. नीरज जाधव याच्या सहभागाबाबतही अद्याप ठोस पुरावा समोर आलेला नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

यानंतर १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिर्डी येथे एका महिलेने एआय-निर्मित अश्लील फोटो पाठवून धमकी दिल्याची तक्रार केली. या तपासादरम्यान अशोक खरातशी संबंधित साक्षीदाराने पोलिसांना काही व्हिडिओ दाखवले. या व्हिडिओमध्ये आठ महिलांचे ३५ व्हिडिओ आढळून आले असून, त्यामध्ये जादूटोणा व भोंदूगिरीच्या माध्यमातून महिलांवर अत्याचार केल्याचे स्पष्ट झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. संबंधित साक्षीदाराला जीविताची भीती असल्याने तो सुरुवातीला पुढे येण्यास तयार नव्हता. पोलिसांनी संरक्षणाची हमी देऊन त्याच्याकडून हे व्हिडिओ जप्त केले, असे फडणवीस यांनी नमूद केले.



### परदेशात पळून जाण्याचा होता कट

अशोक खरात परदेशात पळून जाण्याची शक्यता लक्षात घेऊन दि. १० मार्च २०२६ रोजी लुकआउट नोटीस जारी करण्यात आली. त्यानुसार विमानतळ प्राधिकरणाने तत्काळ त्याच्या विदेश प्रवासावर बंदी घातली. त्यानंतर १३ मार्च रोजी एसआयटी स्थापन करून वावी व शिर्डी येथील गुन्ह्यांचा तपास एकत्रितपणे या पथकाकडे सोपवण्यात आला.

एका महिलेने १७ मार्च २०२६ रोजी सरकारवाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर प्रकरणाला निर्णायक वळण मिळाले. धार्मिक विधींच्या नावाखाली विश्वास संपादन करून, गुंगीकारक पदार्थ देत आणि धमक्या देत वारंवार बलात्कार केल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला. त्यानंतर त्याच दिवशी रात्री अशोक खरात याला अटक करण्यात आली.

प्राथमिक तपासात त्याच्याकडून सहा लाख रुपयांची रोकड, दोन लॅपटॉप, डीव्हीआर, रिव्हॉल्वर, जिवंत आणि वापरलेली काडतुसे जप्त करण्यात आली. पुढील तपासात आणखी काही पीडित महिलांची ओळख पटवून त्यांचे समुपदेशन करण्यात येत असून, त्यांच्या फोटो-व्हिडिओंचे सोशल मीडियावरून निर्मूलन करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. शिवनिका संस्थानची चौकशी

या प्रकरणात शिवनिका संस्थानचीही चौकशी सुरू असून, त्याच्या कार्यकारी संचालक मंडळाचा तपास करण्यात येत आहे. आरोपी, पीडित महिला, तसेच संबंधित पुजारी आणि इतर व्यक्तींचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. खरातकडे किती संपत्ती?

अशोक खरातच्या एकूण संपत्तीविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मिरगाव येथे ३३ एकर जमीन, पाथर्डी गाव १० एकर, नाशिक सिन्नर १० एकर, राहता अहिल्यानगर साडेचार एकर, काकडी तालुका शिर्डा विमानतळ ५.५ एकर जमीन, पाथर्डी फाटा येथे फ्लॅट, ओझरमध्ये पाच गुंठ्याचा प्लॉट, पनवेलमध्ये ४० गुंठे प्लॉट, कॅनडा कोर्ट नाशिक येथे १८० स्क्वेअर फूट ऑफिस, संगमनेरमध्ये मुलीच्या नावावर ८० गुंठे प्लॉट, पुण्यात मुलीच्या नावावर प्लॉट आहे. त्याशिवाय नाशिक कर्मयोगी नगरमध्ये बंगला, राहता येथे साई सिल्व्हर ओक मंगल कार्यालय, सिन्नरमध्ये पाच जणांमध्ये सहा एकर जमीन, मिरगावमध्ये फार्महाऊस, स्वत:कडे १२ तोळे सोने, पत्नीकडे २० तोळे सोने, पत्नीच्या नावे डीमॅट अकाऊंटवर एक ते दोन लाख गुंतवणूक, पाच बँक खात्यांमधील रक्कम मिळून ४० कोटी ८७ लाखांची संपत्ती आहे. यात आणखी वाढ होऊ शकते, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. नातेवाईकांची संपत्तीही तपासणार

अशोक खरातने त्याच्या नातेवाईकांच्या नावावर तर संपत्ती घेतली नाही ना, याची चौकशी करण्यात येणार आहे. आरोपीच्या नातेवाईकांकडे असलेल्या मालमत्तेची माहिती घेत आहोत. आरोपीने कर चुकवेगिरी केली असेल, तर आयकर विभाग कारवाईसाठी पत्रव्यवहार करणार आहे. खरातसोबत वरिष्ठ अधिकाऱ्याने आर्थिक गैरव्यवहार केला का, याची चौकशी सुरू आहे. शिवनिका संस्थानच्या कार्याकारी संचालक मंडळाची सखोल चौकशी करण्यात येत आहेत. इतरही संस्था किंवा ट्रस्ट असेल, तर त्याची चौकशी केली जाईल. त्यातील कार्यकारी मंडळाची चौकशी करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# इराण युद्ध सुरु झाल्यानंतर ट्रम्प यांचा मोदींना पहिल्यांदाच फोन; होर्मुझवरुन रणनीती ठरली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन/नवी दिल्ली: इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल संघर्ष चौथ्या आठवड्यातही सुरुच आहे. या युद्धामुळे जगातील सगळ्याच देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आलेल्या आहेत. युद्धाला पूर्णविराम देण्यासाठी अमेरिका आणि इराणमध्ये गुप्त चर्चा सुरु असल्याची माहिती आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला आहे. याबद्दलची माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी एक्स पोस्टवर दिली आहे. मध्य पूर्वेतील सद्यस्थितीवरुन दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. होर्मुझ सामुद्रधुनीतील कोंडी फोडण्यासंदर्भातही दोन्ही नेत्यांमध्ये बातचीत झाली. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. 'अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी आताच संवाद साधला. त्यांनी मध्य-पूर्वेतील स्थितीवर चर्चा केली. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचं महत्त्व यावरही चर्चा झाली,' असं गोर यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात झालेला कॉल अतिशय महत्त्वाचा आहे. होर्मुझची सामुद्रधुनी जहाजांसाठी खुली करण्यासाठी ट्रम्प यांनी इराणला अल्टिमेटम दिला होता. होर्मुझमधील जल वाहतूक बाधित झाल्याचा परिणाम खनिज तेल आणि नैसर्गिक वायूंच्या किमतींवर झाला आहे. होर्मुझमधील वाहतूक रोखण्याचे प्रयत्न, व्यापारी जहाजांवरील हल्ले स्वीकारार्ह नसल्याचं पंतप्रधान मोदींनी सोमवारी लोकसभेत म्हटलं. मंगळवारी राज्यसभेतही त्यांनी हाच मुद्दा अधोरेखित केला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या सोबत झालेल्या संवादाची माहिती पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर पोस्ट करुन दिली आहे. 'अध्यक्ष ट्रम्प यांचा फोन आला. पश्चिम आशियातील परिस्थितीसंदर्भात चर्चा झाली. तणाव कमी व्हावा आणि आणि लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी अशी भारताची भूमिका आहे.

# काळा बाजार आणि साठेबाजी करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात अमेरिका- इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धावर राज्यसभेत सविस्तर निवेदन केलं. मोदी यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांवर अडकलेल्या भारतीय नौदलाच्या जवानांबाबत चिंता व्यक्त केली. नरेंद्र मोदी यांनी तेल आणि गॅसचचा पुरवठा निश्चित करण्यासाठी मेड इन इंडिया जहाजे आणि स्टोरेजच्या मजबुतीसंदर्भात रोडमॅप जारी करत राज्य सरकारांना साठेबाजी रोखण्याचे आदेश दिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धामुळं निर्माण झालेल्या स्थितीचा फायदा उठवणाऱ्या काळा बाजार आणि साठेबाजी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्यसभेत राज्य सरकारांना दिले निर्देश

करणाऱ्यांविरोधात कडक करावाई करण्याचे निर्देश राज्य सरकारांना दिले आहेत. राज्य सरकारांनी पहिल्यांदा आवश्यक वस्तूंचं सातत्यानं नियंत्रण करावं आणि दुसरं म्हणजे जिथून साठेबाजीच्या तक्रारी मिळतील तिथं तातडीनं कारवाई करावी, असं मोदींनी म्हटलं. संकटाच्या काळात जनतेला महागाईपासून वाचवणं सरकारची प्राथमिकता असावी, असं मोदी म्हणाले.

पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळं झालेलं नुकसान भरुन काढण्यास जगाला खूप काळ लागेल, असं मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वास दर्शवला. आपले आर्थिक आधार खूप मजबूत आहेत. युद्धाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणांपासून वाचण्यासाठी एक मंत्रिगट स्थापन केल्याचं मोदी म्हणाले. सरकार एलपीजीसह पीएनजीच्या वापराला देखील प्राधान्य देत असल्याचं मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की भारताकडे क्रूड ऑईलचा पुरेसा साठा आहे. गेल्या ११ वर्षात ५.३ मिलियन मेट्रिक टन पेट्रोलियम रिझर्व्ह तयार करण्यात आलं आहे. भारत पहिल्यांदा



ऊर्जा साधनांच्या पूर्ततेसाठी २७ देशांवर अवलंबून होता, आता त्याची संख्या वाढवून ४१ देश करण्यात आली आहे.

नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धाला तीन आठवडे पूर्ण झाले आहेत, असं सांगितलं. यामुळं संपूर्ण जगात गंभीर ऊर्जा संकट निर्माण झालं आहे, याचा परिणाम भारतावर देखील झाला आहे, असं मोदींनी म्हटलं. आखाती देशांमध्ये जवळपास १ कोटी भारतीय राहतात, तिथं काम करतात, त्यांच्या जीवनाचं संरक्षण करणं देखील भारतासाठी चिंतेचा विषय आहे, असं मोदींनी म्हटलं.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजं मोठ्या प्रमाणात अडकली आहेत. ज्यात क्रू मेंबर्स मोठ्या प्रमाणात भारतीय आहेत. हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे. या स्थितीत राज्य सभेतून जगभरात संवाद गरजेचा असल्याचा संदेश देऊया असं मोदी म्हणाले. आपण आखाती देश, इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेच्या संपर्कात आहोत. संघर्ष थांबवून होर्मुझची सामुद्रधुनी सुरु ठेवण्यासाठी चर्चा करत आहो, असं मोदी म्हणाले.

### हरीश राणाचा व्हिडीओ पाहून सारेच भावुक

# देशातील पहिला इच्छामृत्यू! हरीश राणाची प्राणज्योत मालवली; १३ वर्षांपासूनच्या त्रासातून मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारतात इच्छामृत्यूची परवानगी मिळवलेला पहिला व्यक्ती ठरलेल्या हरीश राणानं अखेरचा श्वास घेतला आहे. दिल्लीतील एम्समध्ये हरीश राणाची प्राणज्योत मालवली. २०१३ पासून तो कोमात होता. गेल्या १३ वर्षांपासून त्याला लाईफ सपोर्टवर ठेवण्यात आलं होतं.

३१ वर्षीय हरीश राणाला १४ मार्चला गाझियाबादमधील त्याच्या घरातून रुग्णालयात हलवण्यात आलं. त्याच्या ३ दिवस आधी, ११ मार्चला सर्वोच्च न्यायालयानं ऐतिहासिक निर्णय देत त्याला निष्क्रिय इच्छामृत्यूसाठी परवानगी दिली. हरीश राणा पंजाबच्या विद्यापीठात बीटेकचं शिक्षण घेत होता. २०१३ मध्ये तो चौथ्या मजल्यावरुन पडला. त्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली. तेव्हापासून हरीश राणा कोमात गेला. या कालावधीत त्याला अधूनमधून ऑक्सिजन सपोर्ट दिला जात होता.

रुग्णालयात दाखल केल्यानंतर हरीशला डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आलं. गेल्या ८ ते १० दिवसांपासून त्याचं अन्न-पाणी बंद होतं. रुग्णाला हळूहळू मृत्यू येईल अशा पद्धतीनं लाईफ सिस्टिम हटवा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं एम्सला दिल्या होत्या. ही संपूर्ण प्रक्रिया लागू करण्यासाठी डॉक्टर सीमा मिश्रा यांच्या नेतृत्त्वात एक विशेष वैद्यकीय पथक तयार करण्यात आलं. या पथकात न्युरोसर्जरी, ऑन्को-ऍनेस्थेशिया, पॅलिएटिव्ह मेडिसिन आणि मानसोपचार



विभागाच्या तज्ज्ञांचा समावेश होता. भारतात पहिल्यांदाच एखाद्या व्यक्तीला इच्छामृत्यूची परवानगी देण्यात आली. त्यामुळे ही घटना सर्वार्थानं ऐतिहासिक ठरली.

एम्सला नेण्याआधी हरिश राणाच्या गाझियाबादमधील घरातील एका दृश्यानं सारेच भावुक झाले होते. हरीशला एम्समध्ये दाखल करण्यापूर्वी त्याच्या घरी ब्रह्मकुमारी संस्थेच्या महिला सदस्या आल्या होत्या. त्यांनी हरीश राणाच्या कपाळावर टिळा लावला. ते पाहून साऱ्यांचेच डोळे भरुन आले. हरिशचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तो पाहून अनेकांच्या पापण्यांच्या कडा ओलावल्या.


हरीश राणाच्या पार्थिवावर दिल्लीत अंत्यविधी होणार की गाझियाबादमध्ये, याबद्दल कुटुंबानं नेमकी माहिती दिलेली नाही. हरीशचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशाचं आहे. पण नंतर त्याचे वडील कुटुंबाला घेऊन दिल्लीला आले. हरीशच्या उपचारांसाठी त्याच्या वडिलांनी दिल्लीतील त्यांचं घर विकलं. यानंतर ते गाझियाबादमधील एका लहानशा फ्लॅटमध्ये राहायला गेले.

# अखेर बारामती विमान दुर्घटनेबाबत गुन्हा दाखल; रोहित पवारांच्या लढ्याला कर्नाटकातून यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार याच्या लढ्याला अखेर यश आलं असून बारामतीमधील अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी अखेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. बारामती विमानतळाजवळ झालेल्या लियरजेट ४५ विमान दुर्घटनेप्रकरणी कर्नाटकच्य बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. या दुर्घटनेमागे मोठा गुन्हेगारी कट असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आजच रोहित पवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपुरात बस स्टॉपवरुन चार्जर चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला, ऋचप्पल चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला. ऋअंगणात झाडाच्या फांद्या आल्या म्हणून गुन्हा दाखल झाला, मात्र अजित दादांच्या संदर्भात गुन्हा दाखल झाला नाही, ऋज्याचं जळतं त्यालाच कळतं, असेही रोहित पवार यांनी म्हटले होते.

अजित पवार प्रवास करत असेले मुंबईहून बारामतीकडे येणारे तढ-डडघ नोंदणी असलेले बॉम्बार्डियर लियरजेट ४५ विमान २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.४३ ते ८.४५



वाजण्याच्या सुमारास कोसळले. हे विमान तडठ व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे चालवले जात होते. या दुर्घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये त्या वेळचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचाही समावेश होता. या प्रकरणी मृत अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत 'झिरो ऋखठ' म्हणून तक्रार दाखल केली आहे. यापूर्वी त्यांनी २५ फेब्रुवारी रोजी मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे तसेच २६ फेब्रुवारी रोजी बारामती पोलीस ठाण्यात संपर्क साधला होता. मात्र, ऋखठ नोंदवण्यात आला नव्हता. त्यानंतर पुणे सीआयडीकडून केवळ अपघाती मृत्यू अहवालाच्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते.

## संपादकीय....

### राज्यांना निर्देश

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्मिम आशियात अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धावर राज्यसभेत सविस्तर निवेदन केलं. मोदी यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांवर अडकलेल्या भारतीय नौदलाच्या जवानांबाबत चिंता व्यक्त केली. नरेंद्र मोदी यांनी तेल आणि गॅसचचा पुरवठा निश्चित करण्यासाठी मेड इन इंडिया जहाजे आणि स्टोरेजच्या मजबुतीसंदर्भात रोडमॅप जारी करत राज्य सरकारांना साठेबाजी रोखण्याचे आदेश दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धामुळं निर्माण झालेल्या स्थितीचा फायदा उठवणाऱ्या काळा बाजार आणि साठेबाजी करणाऱ्यांविरोधात कडक करावाई करण्याचे निर्देश राज्य सरकारांना दिले आहेत. राज्य सरकारांनी पहिल्यांदा आवश्यक वस्तूंचं सातत्यानं नियंत्रण करावं आणि दुसरं म्हणजे जिथून साठेबाजीच्या तक्रारी मिळतील तिथं तातडीनं कारवाई करावी. संकटाच्या काळात जनतेला महागाईपासून वाचवणं सरकारची प्राथमिकता असावी. पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळं झालेलं नुकसान भरुन काढण्यास जगाला खूप काळ लागेल, असं मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वास दर्शवला. आपले आर्थिक आधार खूप मजबूत आहेत. युद्धाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणांपासून वाचण्यासाठी एक मंत्रिगट स्थापन केले आहे. सरकार एलपीजीसह पीएनजीच्या वापराला देखील प्राधान्य देत आहे. भारताकडे क्रूड ऑईलचा पुरेसा साठा आहे. गेल्या ११ वर्षात ५.३ मिलियन मेट्रिक टन पेट्रोलियम रिझर्व्ह तयार करण्यात आलं आहे. भारत पहिल्यांदा ऊर्जा साधनांच्या पूर्ततेसाठी २७ देशांवर अवलंबून होता, आता त्याची संख्या वाढवून ४१ देश करण्यात आली आहे. नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धाला तीन आठवडे पूर्ण झाले आहेत, असं सांगितलं. यामुळं संपूर्ण जगात गंभीर ऊर्जा संकट निर्माण झालं आहे, याचा परिणाम भारतावर देखील झाला आहे. आखाती देशांमध्ये जवळपास १ कोटी भारतीय राहतात, तिथं काम करतात, त्यांच्या जीवनाचं संरक्षण करणं देखील भारतासाठी चिंतेचा विषय आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजं मोठ्या प्रमाणात अडकली आहेत. ज्यात क्रू मेंबर्स मोठ्या प्रमाणात भारतीय आहेत. हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे. आपण आखाती देश, इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेच्या संपर्कात आहोत. संघर्ष थांबवून होर्मुझची सामुद्रधुनी सुरु ठेवण्यासाठी चर्चा करत आहेत.

# कळंब बाजार समितीच्या शॉपिंग सेंटरचे लिलाव उघड पद्धतीने करावेत; भाई बजरंग ताटे यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील बाजार समिती जिल्ह्यात अव्वल असून,मोठी उलाढाल आहे. जिल्ह्यात सर्वाधिक जागा या बाजार समिती ला आहे. या जागेतील दहा गुंठे जागेवर जवळपास पन्नास गाळे होणार असून,त्याची प्रक्रिया सुरू झाल्याची चर्चा असून, हे गाळे संचालक मंडळ मॅनेज करण्याच्या तयारीत असल्याची माहिती असून, हे गाळे गरजवंत व्यापाऱ्याला न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मानवी हक्क अभियान चे संस्थापक सदस्य भाई बजरंग ताटे यांनी दिला आहे.




कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती च्या वतीने कळंब येथे नियोजीत शॉपींग सेंटर बांधण्याची प्रक्रियेला सुरूवात झाली आहे, या साठी ची वर्तमान पत्रात जाहीरात दिसत नाही. या संदर्भातील जाहीरात वर्तमानपत्रात देण्यात यावी, तसेच सदरील गाळयाचे लिलाव उघडपणे घेण्यात यावेत, लिलाव करतेवेळी मा. जिल्हा उपनिबंधक धाराशिव व मा. तहसिलदार कळंब यांच्या उपस्थितीमध्ये लिलाव करण्यात यावेत अशी मागणी भाई बजरंग ताटे यांनी केली आहे.

कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात होणारे गाळे जे व्यवसाय करतात त्याच व्यापाऱ्यांना लिलाव पध्दतीने देण्यात यावेत. सदरील गाळे कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बेकायदेशिर गैरव्यवहार, अनियमीतता करून मॅनेज करत आहेत , नियोजित शॉपिंग सेंटरच्या प्रक्रियेत अनियमितता आणि गैरव्यवहार होत असल्याचा आरोप मानवी हक्क अभियान चे भाई बजरंग ताटे, व सौ.माया शिंदे यांनी कृषी पणन कार्यलयाकडे निवेदना द्वारे केला आहे. या प्रकरणी प्रशासकीय पातळीवर कर्तव्यात कसूर झाल्याचे दिसून येत असून, ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि कायदेशीर जाहीर लिलावाद्वारे राबवण्याची मागणी केली आहे.

बाजार समितीचे पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात निष्काळजीपणा केल्याचा ठपका निवेदनात ठेवण्यात आला आहे. या प्रकल्पात आर्थिक गैरव्यवहार झाला असून, ठराविक व्यक्तींना फायदा मिळवून देण्यासाठी लिलाव प्रक्रियेत फेरफार केल्याचे आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे. ही सर्व प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा वर्तमानपत्रात जाहीर प्रसिद्धी देऊन, खुल्या आणि पारदर्शक पद्धतीने 'जाहीर लिलाव' करावा, अशी मागणी केली जात आहे. वरील विषय लवकरात लवकर मार्गी लावावा अन्यथा खेटर फेक आंदोलन कृषी उत्पन्न बाजार समिती कळंब यांच्या समोर करण्यात येईल असा इशारा भाई बजरंग ताटे यांनी दिला आहे.

**बाजार समितीच्या शॉपिंग सेंटर मध्ये लिलाव करताना अपंग, एकल महिला,बलुतेदार मागासवर्गीय ,माजी सैनिक यांना आरक्षण ठेवण्यात यावे, अन्यथा गाळे बांधकाम प्रक्रिया थांबवण्यात यावी. अशी मागणी भाई बजरंग ताटे, व माया शिंदे यांनी केली आहे.**

# इतिहास संशोधन पद्धतीवरील ग्रंथाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील उमा महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या डॉ. सुवर्णा हजारे डांगे लिखित 'इतिहासाची ओळख : ऐतिहासिक साधने व संशोधन पद्धती' या संशोधनपर ग्रंथाचे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.



कुलगुरू दालनात पार पडलेल्या या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, संशोधक व मार्गदर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित करण्यासाठी अशा ग्रंथांची गरज अधोरेखित केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर संशोधनाला दिलेले महत्त्व लक्षात घेता, सोप्या आणि नेमक्या भाषेत संशोधन पद्धती समजावून सांगणारे साहित्य अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांच्या कार्याचे कौतुक करून पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक साधनांचा अधिक सखोल अभ्यास करावा, नवीन संशोधन मांडावे आणि इतिहासातील दडलेली माहिती सर्वांसमोर आणावी, असे आवाहन केले.

### विद्यापीठात प्रकाशन सोहळा संपन्न

नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांच्या समन्वयातून शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीची सुस्पष्ट समज आवश्यक आहे. ही गरज ओळखून बी.ए. भाग-२ च्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल, अशा पद्धतीने हा ग्रंथ तयार करण्यात आल्याचे लेखक डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उमेश माने यांनी केले. हा ग्रंथ इतिहास विषयातील विद्यार्थ्यांसाठी तसेच संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने आ. प्रशांतराव परिचारक, प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, एड. प्रणव परिचारक, प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड, प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. नारायणराव लोखंडे, डॉ. हनुमंतराव लोंढे, डॉ. एम. एस. पवार, सूर्यकांत पारखे, तानाजीराव वाघमोडे आदींनी अभिनंदन केले.

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांचे आवाहन

# चैत्री यात्रा: दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : चैत्री यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. २९ मार्च २०२६ रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी २३ मार्च ते ०२ एप्रिल २०२६ असा आहे. या यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दि. २३ मार्च पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे. चैत्री यात्रेला येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात.या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. भक्तीसागर (६५ एकर) येथे भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३)) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणासाठी बीज भांडवल योजना लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाने तृतीयपंथीय घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णय दिनांक १३ मार्च २०२६ नुसार बीज भांडवल योजना राज्यात राबविण्यात येणार असून, या योजनेत तृतीयपंथीय व्यक्तींना स्वयंरोजगार व व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

योजनेत लाभार्थ्याचा ५% हिस्सा, शासनाचे ४५% अनुदान व ५०% बँक कर्ज अशा स्वरूपात मदत मिळणार आहे. लघु (₹२५,०००), मध्यम (₹५०,०००) व दीर्घ (₹२,००,०००) कर्ज सुविधा उपलब्ध असून भाजी स्टॉल, जनरल स्टोअर्स, बेकरी, ब्युटी पार्लर, मोबाइल दुरुस्ती यांसारख्या व्यवसायांसाठी सहाय्य दिले जाईल. याशिवाय कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाचीही सोय करण्यात आली आहे.

पात्रतेसाठी अर्जदार महाराष्ट्रात किमान १० वर्षे वास्तव्य असणे, वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असणे, तसेच सक्षम प्राधिकरणाचे तृतीयपंथीय आेळखपत्र असणे आवश्यक आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी निर्धारित नमुन्यात अर्ज करून आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर कार्यालयात सादर करावा.

या योजनेतून तृतीयपंथीय घटकांना आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाची नवी दिशा मिळणार असल्याचे सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी सांगितले.

# यशस्वी होण्यासाठी कठीण परिश्रम, समर्पण भावना आणि शिस्त आवश्यक : डीवायएसपी प्रदीप गोरड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - 'स्पर्धा परीक्षेत विचारलेले सर्व प्रश्न आत्मविश्वासाने सोडवले तर यशाची शक्यता वाढते व भविष्यात त्याचा फायदा होतो मात्र प्रयत्नात सातत्य आवश्यक आहे. अपयश आले तरी प्रयत्नात खंड पडता कामा नये, हेच स्पर्धा परीक्षा देताना महत्त्वाचे असते. परीक्षा देताना मला प्रत्येक वेळी नवीन अनुभव यायचा आणि यशाला कुठे तरी हुलकावणी मिळायची. पण यातून मी निराश न होता संघर्ष सुरूच ठेवला. एक नाही, दोन नाही तब्बल सातव्या वेळी केलेल्या प्रयत्नानंतर मी अखेर डिवायएसपी झालो. कठीण परिश्रम, समर्पण भावना आणि शिस्त या जोरावर मला अशक्य वाटणाऱ्या यशाला गवसणी घालता आली.' असे प्रतिपादन नूतन पोलीस उपाधीक्षक तथा डीवायएसपी प्रदीप गोरड यांनी व्यक्त केले.



संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये स्पर्धा परीक्षा विषयक 'मार्गदर्शन सत्रा'मध्ये नूतन पोलीस उपअधीक्षक प्रदीप गोरड हे आपल्या यशाचे गुपित उलगडत होते. दीप प्रज्वलनानंतर पोलीस उपाधीक्षक गोरड यांनी आयुष्यात स्पर्धा परीक्षेची सुरुवात, त्यात झालेल्या चुका व मिळालेले अनुभव आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे या तीन टप्प्यांमध्ये मार्गदर्शन करत होते. ते पुढे म्हणाले की, 'प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत, पुढे आठवी मध्ये असताना फौजदार होण्याचे स्वप्न पाहिले, त्या दिशेने मार्गक्रमण करत असताना शाळेमध्ये सतत पहिला किंवा दुसरा नंबर आणायचो. अकरावी, बारावी सायन्स मधून शिक्षण पूर्ण केले, पुढे राज्यशास्त्र विषय घेवून बी.ए. ची पदवी संपादित केली. लहान असताना आईकडून सुरुवातीला 'सरकार' हे शब्द ऐकले. तेथून मी सुरुवातीला 'फौजदार' नंतर 'डीवायएसपी' होण्याचे स्वप्न पाहिले आणि स्वप्न सत्यात उतरविण्याचे ठरवत त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. पहिल्यापासून सहा प्रयत्नांमध्ये पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखती यामध्ये यशस्वी झालो परंतु अंतिम निकालात मात्र दुर्दैवाने फेल व्हायचो. तरीही निराश न होता अखेर सातव्या प्रयत्नानंतर निकालाच्या संकेतस्थळाच्या यादीतून मी पहिल्या क्रमांकावर पोलिस उपअधीक्षक झाल्याचे घोषित झाले. विशेष म्हणजे अखेरच्या परीक्षेमध्ये मागील सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये आलेल्या अपयशाचे आणि दीर्घ अनुभव उपयोगी पडले. माझ्या स्पर्धा परीक्षेत शेवटचा प्रयत्न करत असताना मी आत्मविश्वासावर भक्कम उभा राहिलो. मुलाखतीत रशिया, बांगलादेश, नेपाळ, पाकिस्तान आदी देशा संदर्भातील त्यावेळीच्या परिस्थितीवर गंभीर प्रश्न विचारले गेले. अभ्यास आणि अनुभवाच्या जोरावर सर्व प्रश्नांची उत्तरे आत्मविश्वासाने दिली आणि ज्यावेळी रिझल्ट लागला त्यावेळी मी डीवायएसपी झालो होतो.' गोरडवाडी (ता. माळशिरस) मधील अत्यंत गरीब परिस्थिती असलेल्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आशादायी युवक प्रदीप दुर्योधन गोरड यांची ही प्रेरणादायी कहाणी ! त्यांनी संघर्ष करत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा २०२४ परीक्षेमधून राज्यात १२ व्या रँकने यशाला गवसणी घातली होती. स्वप्न सत्यात उतरण्यासाठी गोरड यांना वेगवेगळ्या परिस्थितीतून जावे लागले. ते म्हणाले, 'आई-वडिलांच्या कष्टाचे सोने केले पाहिजे, त्यांचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे, याशिवाय दुसरा कोणताही आनंद मोठा नाही.' हाच त्यांनी यशाचा कानमंत्र दिला. त्यानंतर त्यांनी स्वामी विवेकानंद, द्रोणाचार्य,अर्जुन यांच्या कथा ऐकवल्या. दरम्यान त्यांनी चार वर्षे मोबाईलचा वापर केला नाही. 'मित्र,सोशल मीडिया याचा कामापुरताच वापर करा.' असाही मेसेज त्यांनी दिला. एकूणच संघर्ष हा महत्त्वाचा असून संयम आणि सहनशिलतेमध्ये यश दडलेले असते म्हणून यशस्वी होण्यासाठी स्वप्न मोठी पहा, आत्मविश्वास बाळगा व ध्येय पूर्ण करण्यासाठी ध्येयवेडे व्हा. मग तुम्ही यशस्वी व्हाल.' असे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे बंधू कर अधिकारी रणजित गोरड, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मंडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### स्वेरीत स्पर्धा परीक्षांसंदर्भात 'मार्गदर्शन सत्र' संपन्न

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कुळ कायद्यातील जाचक अटींमुळे शेतकरी हवालदील; १० टक्के रक्कम भरून जमिनी नावावर करा

## आमदार अभिजीत पाटील यांची विधानसभेत आग्रही मागणी; शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी स्वागत


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/सोलापूर: राज्य सरकारने कुळ कायद्यात सुधारणा करताना जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून ते राज्य सरकारकडे घेणे आणि प्रक्रियेत होणारा विलंब यांमुळे सर्वसामान्य शेतकरी भरडला जात असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली. उजनी धरण परिसरातील ६०० हेक्टरहून अधिक जमीन आणि रांजणी, विमाननगर सारख्या वस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी १० टक्के रक्कम भरून घेऊन या जमिनी 'वर्ग-१' मध्ये रूपांतरित कराव्यात, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली.

विधेयकावरील चर्चेत सहभाग घेताना आमदार पाटील म्हणाले की, उजनी धरणासाठी संपादित केलेली मात्र वापरात नसलेली शेकडो हेक्टर जमीन शेतकरी अनेक वर्षांपासून कुळ म्हणून कसत आहेत. ३०-३० वर्षे उलटूनही ही जमीन त्यांच्या मालकीची झालेली नाही. सातबाऱ्यावर 'कुळ' असा उल्लेख असल्याने या शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज मिळत नाही, घरांच्या बांधकामासाठी परवानग्या मिळत नाहीत आणि सामाजिक स्तरावरही या मुलांची लग्ने जमण्यात अडचणी येत आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, यामुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. नुकत्याच सरकारकडून आलेल्या नोटिसांमुळे भीतीपोटी दोन शेतकऱ्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी सभागृहात दिली.

प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवताना आमदार पाटील यांनी स्पष्ट केले की, जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार राज्य सरकारकडे वर्ग केल्यामुळे फाईलींचा प्रवास लांबणार आहे. मंत्रालयाचे उंबरठे झिजवण्यात शेतकऱ्यांचा वेळ वाया जाईल. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यांकडे हे अधिकार कायम ठेवले तर स्थानिक पातळीवर प्रश्न लवकर सुटतील. अधिकारांचे विकेंद्रीकरण करून जिल्हाधिकाऱ्यांना कालमर्यादा घालून द्यावी, जेणेकरून दोन-तीन महिन्यांत शेतकऱ्यांच्या नावावर जमिनी होतील, असा तोडगा त्यांनी सुचवला.

विमाननगर, रांजणी, सुरली आणि शिराळा यांसारख्या गावांमधील घरांचा आणि शेतीचा प्रश्न या कायद्यामुळे सुटू शकतो. ज्या कारणासाठी जमीन घेतली होती, त्यासाठी ती वापरली नसेल तर ती मूळ शेतकऱ्याला परत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. केवळ २-४ एकर जमीन असणाऱ्या या अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने या कायद्यातील त्रुटी दूर कराव्यात आणि त्यांना कायमस्वरूपी मालकी हक्क द्यावा, अशी विनंती आमदार अभिजीत पाटील यांनी भाषणाच्या शेवटी केली. त्यांच्या या भूमिकेचे उजनी काठच्या शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे.




## राष्ट्रवादीचे सातारा जिल्हा निरीक्षक नागेश फाटे यांचा पंढरपूर काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सातारा जिल्हा निरीक्षकपदी उद्योग, व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांची निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सतीश शिंदे, पंढरपूर तालुका अध्यक्ष संदीप पाटील यांनी फाटे यांच्या पंढरपूर येथील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट देऊन नागेश फाटे यांचा पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे संचालक डॉ. रमेश फाटे, शुभम फाटे, माझी नगरसेवक प्रशांत शिंदे, व्यवस्थापक संग्राम कापसे, विनायक शिंदे, निवृत्ती भटकर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काही दिवसापूर्वी सातारा जिल्हा निरीक्षक पदाची जबाबदारी नागेश फाटे यांना देण्यात आल्याने त्यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असल्याचे दिसून येत आहे.


## आण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य रक्तदान शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक, माथाडी कामगारांचे आराध्य दैवत, मराठा क्रांतीसुर्य, थोर मराठा कै.आमदार आण्णासाहेब पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथी निमित्त अखिल भारतीय मराठा महासंघ,सिंहगर्जना ग्रुप पंढरपूर शहर व तालुका यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूर पंचायत समितीचे सभापती डॉ.शुभम आगवणे व पंढरपूर शहरचे पोलीस निरीक्षक श्री दशरथ वाघमोडे साहेब तसेच मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष श्री अर्जुनराव चव्हाण उपस्थित होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना वाघमोडे साहेब यांनी मराठा महासंघाचे कौतुक केले



की मराठा महासंघाच्या वतीने नेहमीच सामाजिक,समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात व इथुन पुढेही असेच सामाजिक उपक्रम राबविले जावेत असे आवाहन केले व सदिच्छा दिल्या.तसेच अर्जुनराव चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आण्णासाहेब पाटील यांचे मराठा समाजासाठी खुप मोठे मोलाचे योगदान आहे तसेच अखेरच्या श्वासापर्यंत ते समाजासाठी लढले नाही तर स्वतःच्या देहाचे आत्म बलीदान केले तसेच माथाडी कामगारांसाठीही मोलाचं योगदान आहे.तसेच आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला लावलेल्या जाचक नियम व अटी रद्द कराव्यात तसेच अनेक लाभार्थी यांना गेले अनेक महिने हप्ते वेळेवर भरून सुद्धा व्याज परतावा मिळाला नाही तो लवकरच मिळावा. तसेच प्रकरनाची मर्यादा वाढवावी अशी भावना याप्रसंगी बोलताना व्यक्त केली.यावेळीमराठा समाज मंडळाचे अध्यक्ष किरण आप्पा भोसले, आण्णासाहेब पाटील महामंडळाचे समन्वयक श्री. सौरभ मगर, माजी सरपंच शिवाजी खपाले, जिल्हा उपाध्यक्ष - सचिन गंगथडे, युवक जिल्हाध्यक्ष-शिवाजी मोरे, युवा जिल्हा संघटक-रोहित चव्हाण, विद्यार्थीआघाडी जिल्हाध्यक्ष - हनुमंत कदम, तालुकाध्यक्ष- संतोष जाधव, शहराध्यक्ष -अमोल पवार, शहर उपाध्यक्ष- शामराव साळुंखे, शहर संघटक- काका यादव, जिल्हा संघटक- गुरुदास गुटाळ, युवक शहराध्यक्ष- शुभम ताठे- देशमुख, शहर कार्याध्यक्ष- पांडुरंग शिंदे, व्यापार उद्योग आघाडी अध्यक्ष-नानासाहेब शिंदे, रिक्षा संघटना अध्यक्ष- नागेश गायकवाड, महिला तालुका उपाध्यक्षा अर्चनाताई चव्हाण,महिला शहर उपाध्यक्षा अश्विनीताई साळुंखे, आप्पा गाजरे अध्यक्ष भाजपा, विश्वक्रांती मालवाहतूक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप मलपे, ओंकार देसाई, आण्णा पाटील, राघु गुटाळ, वैभव सिरसट, दादा आसबे, सुरज पडवळे, भैय्या देशमुख, महेश बोडके, राजेंद्र चव्हाण, वैभव चव्हाण, विनायक चव्हाण, शकिल मुलानी, राम साळुंखे, सुधिर थिटे, सोपानकाका देशमुख, शिवसेना अध्यक्ष तानाजी मोरे, नागेश कोरके, जिवन गायकवाड, विवेक साळुंखे, सागर पवार, सोहम कुसूमडे, समाधान कुसूमडे, महादेव काशिद, रोहित कदम, राजू येलपले यांच्या सह समाज बांधव भगिनी मराठा महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## प्रा. कैलास गवळी यांची राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कारासाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव येथील भूमिपुत्र तसेच महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे आदर्श प्राचार्य कैलास आण्णा गवळी यांना आश्रय फाउंडेशन तालुका मालेगाव आयोजित राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार सोहळ्यासाठी निवड करण्यात आली आहे , प्राचार्य कैलास गवळी यांनी अल्पावधीतच विद्यालयाला नावलौकीन प्राप्त करून दिला असून शैक्षणिक क्षेत्रात विद्यालयाला उंचीवर नेऊन ठेवले आहे त्यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कारा साठी निवड करण्यात आली आहे मालेगाव येथील आश्रय आशा फाउंडेशन वऱ्हाणे यांच्यावतीने ..राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार सन्मान २०२६ या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व लोकसेवेचे कार्य करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारार्थींची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून राज्यातील विविध जिल्ह्यांमधून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा व कार्याचा सखोल आढावा घेऊन निवड समितीने समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तीची निवड केली आहे. या राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार सोहळ्यासाठी प्राचार्य कैलास अण्णा गवळी यांच्या कार्याची दखल घेत पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती पुरस्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक राजेंद्र राऊत पाटील यांनी दिली आहे. पुरस्कार वितरण सोहळा शनिवार २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी दहा वाजता हरिकेश लॉन्स बॅक्वेट हॉल दाभाडी रोड दौलती शाळेजवळ मालेगाव कॅम्प* जिल्हा नाशिक येथे नामावंत मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानपत्र. देऊन सन्मानित केले जाणार आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे ज्येष्ठ मार्गदर्शक दीपक जोंधळे, सचिव दत्ताभाऊ जोंधळे ,विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर ढोमसे ,उपाध्यक्ष साहेबराव पानगव्हाणे विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उगाव ,शिवडी , हिंगलाज नगरचे सर्व पालक,विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या,

## पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : अणदूर तालुका तुळजापूर येथील दै.पुण्यनगरीचे निर्भीड व झुंजार पत्रकार आणि सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्व शिवशंकर तिरगुळे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि.२३ मार्च २०२६ रोजी रात्री १ वाजता वयाच्या अवघ्या ४६ व्या वर्षी दुःखाद निधन झाले.

त्यांच्या अचानकपणे जाण्याने तिरगुळे कुटुंबीयावर दुःखा चा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जातआहे.

शिवशंकर तिरगुळे यांनी आपल्या आयुष्यात पत्रकारितेच्या माध्यमातून समाजासाठी प्रामाणिकपणे काम केले,अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी लेखणी झिजवली,तसेच विविध सामाजिक उपक्रमात ते अवर्जुन सहभाग घेत असत. ते चन्नबसव सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी सन २१९ मध्ये ट्री बँकेची सुरुवात केली होती.अणदूर व परिसरात संस्थेच्या माध्यमातून हजारो वृक्षांची लागवड केली आहे.



केवळ लागवड करूनच न थांबता दरवर्षी वृक्षाचा वाढदिवस साजरा करूनत अणदुर व परिसर हिरवा गार आणि सुंदर करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.अत्यंत संयमी आणि मितभाषिक प्रेमळ असं व्यक्तीमहत्व काळाच्या पडद्याआड झाले आहे.अणदूर येथेच त्यांचा पार्थिवावार लिंगायत धर्म संस्कारानुसार दफण करून अंतिम संस्कार करण्यात आले आहे.या प्रसंगी अणदूर,नळदुर्ग तुळजापूर, जळकोट,इटकळ व परिसरातील पत्रकार बंधू-भगिनी, विविध संस्था, संघटना, सामाजिक,राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई वडिल पत्नि, एक मुलगा, एक मुलगी, भावंडे असा परिवार आहे.

कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित केलेल्या भव्य सत्कार कार्यक्रमात प्रतिपादन

## कल्याणशेट्टी कुटुंबीयांवर जनतेचा विश्वास म्हणूनच मिळाले निवडणुकीत यश : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनानुसार सौ शांभवी कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी व सागर कल्याणशेट्टी यांनी निवडणुकीत नेतृत्व कौशल्य आणि कर्तुत्वाच्या जोरावर विजय संपादन केला आहे. कल्याणशेट्टी कुटुंबीयांनी शहर व ग्रामीण भागातील बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी अहोरात्र कष्ट घेतले म्हणूनच निवडणुकीत घवघवीत यश मिळाले आहे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय तसेच मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी वरिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत विजयी झालेल्या कल्याणशेट्टी कुटुंबातील सदस्यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी जिल्हा परिषदेच्या नुतन सदस्या सौ शांभवी कल्याणशेट्टी, अक्कलकोट नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री मिलन कल्याणशेट्टी व अक्कलकोट पंचायत समितीचे नुतन उपसभापती श्री सागर कल्याणशेट्टी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक दंतकाळे, बापूजी निंबाळकर, शिवानंद पुजारी, दिगंबर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, सत्कार हा केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नसून तो समाजाच्या मूल्यांचा सन्मान आहे. सत्कारामुळे समाजात चांगल्या विचारांची आणि कार्याची परंपरा निर्माण होते आणि समाज अधिक सक्षम व प्रगत बनतो. म्हणून संस्थेने हा सत्कार केला आहे.





यावेळी निशिगंधा सोमेश्वर, दिगंबर जगताप, बापूजी निंबाळकर, डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे, जि प सदस्या शांभवीताई कल्याणशेट्टी यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले आभार प्रा गुरुशांत हपाळे यांनी मानले

## दिनकर शिंदे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील पालखेड मिरचीचे येथील प्रगतिशील शेतकरी कै.दिनकर पुंजाजी शिंदे यांचे वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून आणि मुली असा मोठा परिवार आहे.

.रामदास पुंजाजी शिंदे यांचे ते भाऊ होते. तर .गोरख शिंदे यांचे ते वडील होते.

# मुलांच्या सोशल मीडिया वापरावरील नियंत्रणाच्या नियमांची अंमलबजावणी करा!

## आमदार समाधान आवताडे यांनी सभागृहात मंत्रीमहोदयाचे वेधले लक्ष




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
विधानभवन, मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मुलांच्या सोशल मीडिया अतीवापराचा गंभीर मुद्दा आमदार समाधानदादा आवताडे साहेब यांनी सभागृहात उपस्थित करत मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधले.

या दरम्यान माहिती व तंत्रज्ञान मंत्री श्री. आशिषजी शेलार यांच्या नेतृत्वात नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या विशेष टास्क फोर्सचे प्राथमिक निष्कर्ष काय आहेत आणि त्यांच्या शिफारसींची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून करणार का, याबद्दल सभागृहात आमदार समाधानदादा आवताडे साहेब यांनी विचारणा केली.

मुलांच्या दैनंदिन मोबाईल गेमिंग वेळेवर वेळ मर्यादेचे नियंत्रण तसेच, गेमिंग कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे काय पाठपुरावा करत आहे, याबद्दलही विचारणा केली. यासोबतच, राज्यातील शाळांमध्ये 'स्क्रीन फ्री सॅटरडे' हा उपक्रम राबविण्यासाठी शासनाने कुठली स्वतंत्र नियमावली तयार केली आहे का, हा प्रश्न उपस्थित केला.

या उपस्थित सर्व प्रश्नांवर माहिती व तंत्रज्ञान मंत्री श्री. आशिषजी शेलार यांनी सकारात्मक भूमिका घेत प्राथमिक निष्कर्षाचा अहवाल पुढील तीन महिन्यात येणे अपेक्षित असून या अहवालानुसार ठोस पावले उचलण्यात येतील, असे स्पष्ट केले. तसेच, 'स्क्रीन फ्री टाईम' या विषयी शिक्षण विभागाशी चर्चा या टास्क फोर्स मध्ये होईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची २५ मार्च पासून ऑनलाईन नोंदणी : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा व तुळशी अर्चन पूजा इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि. २५ मार्च रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. ०३ मार्च, २०२४ रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

दि. ७ ऑक्टोबर, २०२४ पासून श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा टप्प्याटप्प्याने ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै, २०२६ मधील पुजांची होणार नोंदणी**

आता, पुढील टप्प्यात दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व महानैवेद्य सहभाग योजना तसेच माहे एप्रिल, २०२६ मधील तुळशी अर्चन पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५,०००/-, रू.११,०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५,०००/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच महानैवेद्य सहभाग योजनेसाठी रू.७,०००/- इतके देणगी मुल्य आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : भारताचे संविधान निर्माता, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त रखुमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

ारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पंढरपूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते. जयंती निम्मित शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय.मुजावर, रेखा घनवट, सहा. पोलीस निरिक्षक योगेश लंगुटे, नगर अभियंता श्री केसकर, महावितरणचे अधिकारी तसेच शहरातील व तालुक्यातील जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकर्ते व पोलीस पाटील उपस्थित होते.

या बैठकीत डॉ. आंबेडकर जयंती डिजेमुक्त, शांततामय आणि उत्साही वातावरणात साजरी करावी. जयंती अनुषंगाने लावण्यात येणारे पोस्टर, बॅनर , झेंडे हे परवानगी घेऊन व योग्य ती खबरदारी घेऊन लावावे तसेच ते आक्षेपार्ह असु नयेत याची दक्षता घ्यावी, मिरवणूक काढण्यापूर्वी किमान तीन दिवस अगोदर परवाना घेणे बंधनकारक आहे. मंडळानी पारंपरिक वाद्याचा वापर करावा तसेच सामाजिक उपक्रम राबवावेत अशा मंडळांना पोलीस प्रशासनातर्फे पारितोषिक देण्यात येणार आहे. आगामी जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकीचा मार्ग, सार्वजनिक कार्यक्रमांचे नियोजन, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच पोलिसांना सहकार्य करण्याबाबत उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच जयंती मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# उगाव हायस्कूलचा आरव मेधणे नवोदय परीक्षा उत्तीर्ण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : केंद्र शासनाच्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेत उगाव येथिल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालया चा कु. आरव गणेश मेधने या विद्यार्थ्याने उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले.

या परीक्षेत इयत्ता पाचवीतील एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी आरव गणेश मेधणे याने ९५.००% गुण मिळवत ३५ वा क्रमांक पटकावला आहे या विद्यार्थ्यांने गुणवत्ता यादीत स्थान मिळवत उत्कृष्ठ यश संपादन केले असून त्याची पुढील शिक्षणासाठी जवाहर नवोदय विद्यालय खेडगाव (ता.दिंडोरी )* येथे निवड झाली आहे.या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे ,ज्येष्ठ मार्गदर्शक , दीपक भाऊ जोंधळे सचिव दत्ताभाऊ जोंधळे, विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर आप्पा ढोमसे, उपाध्यक्ष साहेबराव आबा पानगव्हाणे, विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी,पर्यवेक्षक नंदाराम ढिकले यांनी कु.आरव चे व त्याला मार्गदर्शन करणारे गवळी योगेश, गणेश मेधने , आरीफ सय्यद यांचे अभिनंदन केले.

# वंचित समाजाला डॉ. बाबासाहेबांनी घटनादत्त अधिकार मिळवून दिले : भंदत करुणानंद महाथेरो



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पुणे : हजारो वर्षापासून आपल्या न्याय व हक्क अधिकारापासून उपेक्षित वंचित असलेल्या या देशातील अनुसूचित जाती व जमाती ओबीसी भटके विमुक्त समाजाला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानिक घटनादत्त अधिकार मिळवून दिले. त्यामुळेच आज हा समाज प्रगतीकडे वाटचाल करत असून. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी बाबासाहेबांनी बौद्ध धम्म दिला. आपण धम्माचे आचरण करावे कुशल कर्म करावे असा धम्मोपदेश भंदत करुणानंद महाथेरो यांनी बौद्ध धम्म परिषदेमध्ये धम्मदेशनेप्रसंगी बोलताना व्यक्त केले.

भारतीय बौद्ध महासभा, अष्टांग मार्ग संस्थेच्या विद्यमाने दिनांक २२ मार्च २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगाव, ता शिरूर जिल्हा पुणे येथे पहिल्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी भंदत करुणानंद महाथेरो हे होते.

भंदत बुद्धघोष महाथेरो, भंदत रत्नदीप थेरो, भंदत धम्मबोधी,, भंदत धम्मानंद, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, आदीची प्रमुख उपस्थिती होती.

धम्मदेशना देताना भंदत बुद्धघोष म्हणाले की, दुःखातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे धम्म होय. आपण शिलाचे पालन केले पाहिजे. शिल आपला अलंकार आहे. आपण प्रकाशाकडुन प्रकाशाकडे गेले पाहिजे.

भंदत रत्नदीप थेरो, धम्मबोधी, धम्मानंद यांनीही धम्मदेशना दिली.

धम्म परिषदेला रिपब्लिकन पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, शिरूरच्या माजी नगरसेविका मायाताई गायकवाड, कारेगावच्या सरपंच हौसाबाई जगताप, कर्डेचे उपसरपंच राजू गायकवाड ग्रामविकास अधिकारी शांताराम पांडळे, धम्मसेवक किशोर वाघमारे,कैलास पाटील, पत्रकार रामदास लोखंडे, बार्टीचे राहुल कवडे, भारतीय बौद्ध महासभेचे शिरूर तालुका अध्यक्ष अनिल जगताप, रिपाईचे शिरूर तालुका अध्यक्ष नवनाथ कांबळे, धम्मसेवक मुकेश गायकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते.

**कारेगावात धम्म परिषदेला अलोट गर्दी**

धम्म परिषद यशस्वी होण्यासाठी आयोजक भैय्यासाहेब सोनकांबळे, अनिल कांबळे, भास्कर पाडळे, आंनदा उघडे, पोपट सोनवणे, अनिल जगताप यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे व अष्टांगिक मार्ग संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व धम्म बांधवांनी परिश्रम घेतले.

ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ परिसरात प्रथमच बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केल्याबद्दल बौद्ध बांधवांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

पांढरे शुभ्र कपडे परिधान करून मोठ्या संख्येने महिला मुले सहभागी झाले होते. सुत्रसंचलन अनिल कांबळे यांनी केले. आभार आयोजक भैय्यासाहेब सोनकांबळे यांनी मानले.

## नैताळेत महामार्गावर रास्ता रोकोचा इशारा अन् प्रशासनाची धावपळ, नंतर सुटेकाचा निश्वास..!!

# कालव्याच्या कडेला कपडे धुताना पडलेली तरुणी कालव्यात डोंगरगाव शिवारात सापडली..!






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी :- पालखेड डाव्या कालव्याच्या चारी नंबर १७ जवळ नैताळे शिवारात कालव्याच्या कडेला कपडे धुण्यासाठी गेलेल्या एका १८ वर्षीय तरुणीचा पाय घसरून कालव्याच्या प्रवाहात पडल्याची घटना शनिवार रोजी दुपारी साडेचार वाजेच्या दरम्यान घडली.सदर तरुणीचा मृतदेह कालव्यात शोध घेऊनही सापडत नसल्याने आज लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे यांच्या नेतृत्वाखाली तरुणीचे नातेवाईक व ग्रामस्थ यांनी रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देताच पोलिस ,महसुल व पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी प्रचंड धावपळ होऊन त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनाला पाचारण करुन शोध मोहीम सुरु केली शोध सुरु असताना त्या तरुणीचा मृतदेह कालव्यात डोंगरगाव परिसरात सापडल्याने सर्व अधिकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला.

पालखेड डाव्या कालव्याच्या चारी नंबर १७ जवळ नैताळे शिवारात ज्योती अनिल शेकरे वय १८ वर्षे, मुळ रा. ओबीधोंड, ता. पेठ (सध्या कामाच्या निमीत्ताने नैताळे येथे) ही तरुणी कपडे धुण्यासाठी कालव्यावर गेली होती.मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने किंवा पाय घसरल्याने ती थेट कालव्यात वेगाने वाहणाऱ्या पाण्यात पडली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व कुटुबाने मदतीसाठी धाव घेतली पाण्यात पोहणार्या अनेक तरुनानी शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र तीचा मृतदेव मिळुन आला नाही या घटनेची माहीती मिळताच तातडीने तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन शोधमोहिमेचे नियोजन केले होते निफाड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली होती तसेच कालव्याच्या पात्रात तरुणीचा शोध घेण्यासाठी विशेष रेस्क्यू पथक तैनात करण्यात आले होते मात्र शोध लागत नव्हता.आज या घटनेला तिसरा दिवस होत असल्याने त्या तरुणीचे नातेवाईक व ग्रामस्थ यांनी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे यांच्या नेतृत्वाली नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देऊन रास्ता रोको आंदोलन करण्याच्या तयारीत असतानाच निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे निफाड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक गणेश गुरव यांनी घटनास्थळी भेट देऊन राजेंद्र बोरगुडे व आंदोलकांशी सवांद साधवा या वेळी त्यांच्यात चांगलीच तू... तू..मै..मै झाली आंदोलनकर्त्याना पाण्यात वाहुन गेलेल्या तरुणीचा मृतदेह हवा असल्याने पोलिस,महसुल व पाटबंधारे विभागाने पुन्हा आज शोध मोहीम सुरु केली स्थानिक तरुण तसेच आपत्ती व्यावस्थापनाचे सागर गडाख व टिम यांना पालखेड डाव्या कालव्यात पुन्हा शोध मोहीम सुरु केली शोध सुरु असतानाच त्या तरुणीचा मृतदेह कालव्यात डोंगरगाव शिवारात सापडला आणि सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी अक्षरशः सुटकेचा निश्वास टाकला. या शोध मोहीमेत अधिकाऱ्यांसह पोलिस ठाण्याचे नितीन सांगळे,राजेंद्र दरोडे,विनोद जाधव,सागर घोलप,योगेश आव्हाड,कपालेश्वर ढिकले, महसुलचे मंडळ अधिकारी संतोष डुंबरे ,नैताळेचे तलाठी शंकर खडांगळे ,पाटबंधारे विभागाचे विंचूर ५ अ चे अधिकारी वैभव कळमकर,नैताळे शाखा अधिकारी हर्षल बागुल ,समाधान आढांगळे हे सहभागी झाले होते.सदर मुलीचा मृतदेह शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.